नि.दि.दा.क्र.६३/२०२२
नि.क्र.२८

<u>उलटतपास प्रतिवादीकरीता विधीज्ञ श्री. लिपटे यांच्या वतीने शपथेवर</u>

<u>सुरु</u> -

१. हे म्हणणे खरे आहे की, वादीने सांगितल्यावरुन मी न्यायालयात साक्ष देण्याकरीता आले. हे म्हणणे खरे आहे की, न्यायालयात काय साक्ष दयाची याबाबत वादीने मला सांगितले. मी "टी.एम. सोनार" या चाळीमध्ये राहते हे दाखविण्याकरीता मी कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. साक्षीदार स्वतः सांगते की, त्या "टी.एम. सोनार" या चाळीमध्ये राहते हे दाखविण्याकरीता त्यांच्याकडे पावती आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी "टी.एम. सोनार" या चाळीमध्ये राहत नाही.

२. हे म्हणणे खरे आहे की, वादी व त्याची भावजाई आशा दत्तात्रय सोनार या दोघांमध्ये वडिलोपार्जित मिळकतीबाबत वाद सुरु आहेत. हे म्हणणे खरे आहे की, त्या वादा संदर्भात त्या दोघांमध्ये न्यायालयात दावे देखील झाले होते. वादी व आशा दत्तात्रय सोनार या दोघांमध्ये वडिलोपार्जित मिळकतीबाबत काय व्यवहार झाले याबाबत मला वैयक्तीक माहिती नाही. "टी.एम. सोनार" या चाळीतील खोल्यांबाबत त्या दोघांमध्ये झालेल्या बैठकीला मी कधीही उपस्थित नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, "टी.एम. सोनार" या चाळीतील खोल्यांबाबत त्या दोघांमध्ये अदयाप वाद सुरु आहेत.हे म्हणणे खरे आहे की, "टी.एम. सोनार" या चाळीतील खोल्यांबाबत त्या दोघांमध्ये अदयाप वाद सुरु असल्याने कोणती खोली कोणाला मिळाली हे अदयाप ठरलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादीच्या सांगण्यावरुन मी पुराव्याचे खोटे प्रतिज्ञापत्र दाखल केले.

**<u>उलटतपास पूर्ण.</u>**

**<u>फेरतपास नाही.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत,

ASHISH BIHARILAL MARLECHA
Digitally signed by ASHISH BIHARILAL MARLECHA
Date: 2026.01.22 16:38:01 +0530

(आशिष बि. मरलेचा)
दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर
श्रीरामपुर, जि.अहमदनगर

दिनांक २२/०१/२०२६